अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

पानमंगरूळ येथे विवाहितेचा आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर : पानमंगरूळ (ता.अक्कलकोट) येथील २२ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केली. ही घटना रविवारी दुपारच्या सुमारास पानमंगरूळ येथील गोकुळ साखर कारखान्याच्या आवारात घडली. साईना नंदीलाल पावरा(वय २२ रा. पानमंगरूळ) असे गळफास घेतलेल्या विवाहितेचे नाव आहे. तिला बेशुध्द अवस्थेत नंदीलाल (पती) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. रविवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास ती कारखान्याच्या घरातील छताच्या लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतली होती.या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

www.surajyadigital.com | सोमवार, दि. १० फेब्रुवारी २०२५ | वर्ष : २३ वे | अंक : १३३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

चार राज्यांमध्ये काँग्रेसच्या हाती भोपळा, दिल्लीश्वरांच्या पोटात उठलाय गोळा

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाच्या पराभवावर जशी चर्चा व्हायला लागलीय, तशी ती काँग्रेसच्या भोपळा संख्येवर व्हायला लागलीय.इतर तीन राज्यांच्यानंतर दिल्लीतही काँग्रेसच्या हाती भोपळा आला आहे.म्हणजेच त्यांच्या आमदारांची संख्या या चार राज्यांमध्ये शून्य आहे.त्यामुळे काँग्रेसवर आत्मचिंतनाची वेळ आली आहे मात्र काँग्रेसचे दिल्लीश्वर नेते अजूनही पारंपरिक विचारात रूतून बसल्याचे चित्र दिसत आहे.दिल्लीचा निकाल आल्यानंतर दिल्लीतील काँग्रेसच्या नेत्यांनी तोंडाला चिकटपट्टी लावल्याचे दिसत आहे.एरव्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने ठणाठणा करणारे काँग्रेस नेते तोंडाला चिकटपट्टी बांधून बसल्याचे दिसत आहे.

दिल्लीत काँग्रेसच्या हाती तिसऱ्यांदा भोपळाच आला आहे. चार राज्यात देखील काँग्रेसची पाटी कोरीच राहिली आहे. देशातील दोन बड्या व तीन छोट्या राज्यात काँग्रेसचा एक देखील आमदार नाही. त्यामुळे येत्या काळात या सर्वच राज्यात काँग्रेसला आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

भाजपच्या या लाटेत आपसोबतच काँग्रेसचा देखील सुफडासाफ झाला आहे. विधानसभेच्या ७० जागा असलेल्या दिल्लीत काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही. त्यासोबतच अन्य चार राज्यातदेखील काँग्रेसची पाटी कोरीच राहिली आहे.

काँग्रेसचा दिल्लीत सुपडासाफ होण्याची ही पहिली वेळ नाही या पूर्वी दोन वेळा भोपळा फोडता आलेला नाही. दुसरीकडे देशातील आणखी चार राज्यात काँग्रेस शून्यावर आहे. यामध्ये आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल सारख्या मोठ्या राज्यांचा देखील समावेश आहे.

तिसऱ्यांदा काँग्रेसच्या जागात कोणताही बदल झालेला नाही. यामध्ये आंध्रप्रदेश आणि पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि नागालँड या राज्यांचा त्यामध्ये समावेश आहे. त्यामुळे येत्या काळात काँग्रेसला या राज्यात पक्ष वाढीवर लक्ष द्यावे लागणार आहे. काही राज्यात प्रादेशिक पक्ष वरचढ ठरत असताना काँग्रेसला मिळत असलेले अपयश आत्म चिंतन करायला लावणारे आहे.

पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसची पाटी कोरीच

● पश्चिम बंगाल विधानसभेत २९४ जागा आहेत. २०२१ च्या मे महिन्यात येथे निवडणुका झाल्या होत्या. या निवडणुकीत काँग्रेसला प्रथमच पश्चिम बंगालमध्ये मोठा पराभव सहन करावा लागला आहे. पहिल्यांदाच काँग्रेसला शून्य जागा मिळाल्या आहेत. बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचे सरकार असून पक्षाचे २२४ आमदार निवडून आले होते. तर विरोधी पक्ष भाजपकडे ६६ आमदारांचे बळ आहे.

आंध्र विधानसभेत काँग्रेस शून्यावरच

● आंध्र प्रदेशात आठ महिन्यापूर्वीच निवडणूक झाली आहे. या निवडणुकीत काँग्रेसला यश मिळेल, असे चित्र होते. परंतु काँग्रेसला एक देखील जागा जिंकता आली नाही. पक्षाचे बहुतांशी आमदार तिसऱ्या क्रमांकावर ढकलेले गेले.

नागालँड काँग्रेसच्या नावावर भोपळा

● नागालँड विधानसभेत एकूण ६० जागा आहेत. येथे फेब्रुवारी २०२३ मध्ये विधानसभेची निवडणुका झाल्या होत्याा. काँग्रेसला एका जागेवर विजय मिळाला नाही. येथे कोणताही विरोधी पक्ष नाही.

सिक्कीमधील सर्व जागा एनडीएकडे

● सिक्किम विधानसभेच्या एकूण ३२ जागा आहेत. एकेकाळी सिक्कीम हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता. परंतू आता काँग्रेसकडे एक आमदार नाही. सिक्कीममध्ये काँग्रेस शून्यावर पोंहचली आहे. सिक्कीमच्या सर्व ३२ जागांवर सिक्किम क्रांतिकारी मोर्चा यांचा ताबा आहे. एसकेएम येथे भाजपाच्या सोबत एनडीएसोबत आहे.

तीन राज्यांत काँग्रेसचा प्रत्येकी एक आमदार

● अरुणाचल विधानसभेच्या एकूण ६० जागा आहेत. या ठिकाणी एनडीएने ५९ जागा मिळवल्या आहेत. अरुणाचल येथे काँग्रेसचा केवळ एक आमदार आहे. याच प्रकारे मेघालय आणि मिझोरममध्ये देखील काँग्रेसचा प्रत्येकी एक आमदार आहे. याच प्रकारे मणिपूर आणि पुडुचेरी राज्यात काँग्रेसकडे प्रत्येकी दोन आमदार आहेत. पुडुचेरीत अलिकडेपर्यंत काँग्रेसचे राज्य होते. मणिपूरमध्ये देखील काँग्रेसचा एकेकाळी दबदबा होता. मात्र, गेल्या काही दिवसांपासून चित्र बदलत आहे. प्रत्येक राज्यात काँग्रेसला मोठा पराभव सहन करावा लागत आहे.

दारुण पराभवातही दिसतो आशेचा किरण

● दिल्लीत सलग १५ वर्षे सत्तेत राहिलेल्या काँग्रेसला सलग तीन निवडणुकांमध्ये एकही जागा मिळवता आलेली नाही. काँग्रेसच्या इतिहासात निवडणुकांबाबत एवढी मोठी नामुष्की पक्षावर कधीच ओढवली नसेल. खरंतर आम आदमी पक्षाची सत्ता गेली असली तरी काँग्रेससाठी हा सर्वात मोठा पराभव म्हणावा लागेल. पण असे असूनही काँग्रेसचे नेते एका गोष्टीवरून चेहऱ्यावर आनंद दाखवू लागले आहेत. दिल्लीतील काँग्रेसच्या नेत्यांना आपचा पराभव करायचा होता आणि तसे झालेही. त्याचाच सर्वाधिक आनंद या नेत्यांना झाला आहे. काँग्रेसला राज्यात एकही जागा मिळाली नसली तरी मतांची टक्केवारी वाढली आहे. या निवडणुकीत काँग्रेसला ६.३४ टक्के मते मिळाली आहे. २०२० मधील निवडणुकीच्या तुलनेत मतांचा टक्का २.१ ने वाढला आहे.मतांचा हा वाढलेला टक्काच काँग्रेस नेत्यांना आशेचा किरण वाटतो. काँग्रेसचे काहीच नुकसान झाले नाही उलट फायदा झाल्याचे नेते सांगू लागले आहेत.

आता पुढे काय?

● निवडणूक जवळ आल्याशिवाय कामाला लागायचे नाही, हे मागील काही निवडणुकीतील चित्र आतातरी काँग्रेसला बदलावे लागणार आहे. पण दिल्लीत दोन टक्के वाढलेल्या मतांच्या आशेवर पुढील पाच वर्षे समाधान मानून गप्प बसणार असतील तर पुन्हा भोपळा मिळाल्यास आश्चर्य वाटायला नको. दिल्लीत आपला ४० टक्क्यांहून अधिक मते मिळाली आहे. त्यामुळे या पराभवाने आप पुन्हा ताकद दाखवू शकणार नाही, या भ्रमात काँग्रेसने राहू नये.

जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

सोलापूर/प्रतिनिधी

पतीच्या पाठीमागे बसून प्रवास करताना स्पीडब्रेकरवर दुचाकी आदळून जखमी झालेली ४४ वर्षीय महिला उपचारादरम्यान रविवारी दुपारी मयत झाली. शोभा महेश पाटकुलकर (वय ४४ रा. अमृतनगर विजापूर रोड, सोलापूर) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या बुधवार दि.५ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास पतीच्या दुचाकी पाठीमागे बसून कर्णिक नगर ते अक्कलकोट रोड लक्ष्मी मंदिराच्या दिशेने निघाल्या होत्या.

शनी मंदिराजवळील स्पीड ब्रेकरवर दुचाकी आदळल्याने त्या पाठीमागे कोसळून जखमी झाल्या होत्या. त्यांना खाजगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून बेशुध्द अवस्थेत शनिवारी सायंकाळी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्या रविवारी दुपारी मयत झाल्या. या अपघाताची नोंद जेलरोड पोलिसात झाली आहे.

कंटेनरची मोटारसायकलसह मिनी बसला धडक; एक ठार

मोहोळ : वेगाने येणाऱ्या कंटेनरने मोटरसायकलसह मिनीबसला धडक देऊन झालेल्या अपघातात एक ठार तर १४ जण जखमी झाले. ही घटना रविवारी दुपारी अडीच वाजता सोलापूर-पुणे महामार्गावर तळेगाव पाटीजवळ घडली. या अपघातात मोटारसायकस्वार ठार झाला तर बस उलटल्याने प्रवासी जखमी झाले आहेत.

तुळजापूर-अक्कलकोट देवदर्शन करून भोर तालुक्यातील प्रवासी पंढरपूरकडे देवदर्शनासाठी एम.एच. १२ के.क्यु. ११७५ या मिनी बसमधून निघाले होते. त्यात एकूण चालकासह १५ प्रवासी प्रवास करीत होते. ही बस कोळगाव पाटीजवळ आली असता पुण्याहुन सोलापूरच्या

दिशेने जाणाऱ्या कंटेनर (एन.एल. ०१ ए.ए. ७२०५) ने रोड क्रॉस करणाऱ्या एम.एच. १३ सी. एन. ०३३५ या मोटार सायकलला जोराची धडक दिली व पुढे येवून मिनी बसलाही धडक दिली. यात मोटारसायकवरील दयानंद भोसले (रा. लांबोटी, ता. मोहोळ) हे जखमी होऊन मयत झाले. मिनी बसमधील सई मांढरे, सोनाली पडुळकर, रेखा चौधरी, चालक लक्ष्मण पवार, संगीता शेंडगे, तेजस्वीनी मांढरे, प्राची मांढरे, छाया शेंडगे, बेबी गायकवाड, कोमल मांढरे, परी जोरकर, भक्ती मांडरे, अनिता बारके, आरोव खाडे (सर्व रा. पुसेगाव, ता. भोर) हे गंभीर जखमी झाले. यातील प्रवाशांना उपचारासाठी सोलापूर तर काहीना मोहोळ येथे लाईफ केअर हॉस्पीटल येथे हलवण्यात आले मोटारयाकलवरील दयानंद भोसले यांना सोलापूर येथील सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल केल होते. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. घटना घडल्यानंतर एपीआय पाटील, पो. हे. कॉ. अतुल क्षीरसागर, हवालदार आदलिंगे तसेच कोळेगाव येथील हॉटेल मधील कर्मचाऱ्यांनी मदत केली.

हॉटेलमध्ये झालेल्या मारहाणीत एकजण गंभीर जखमी

मोहोळ : हॉटेलमध्ये जेवण करीत असताना पूर्वीच्या भांडणावरून खुर्ची आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत छातीचे हाड फ्रॅक्चर होऊन एकजण गंभीर जखमी झाला. ही घटना गुरुवारी रात्री लांबोटी येथील येरमाळा हॉटेलमध्ये घडली. मोहोळच्या पोलिसांनी अर्जुनसोंड येथील चौघांवर गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली.

सुरेश प्रभाकर हावळे (वय ५६ रा. अर्जुनसोंड ता.मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. त्यांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोहोळच्या पोलिसांनी दादा तानाजी हावळे त्याचे दोन भाऊ छगन व बापू तानाजी हावळे आणि बंडू मुकुंद ढेरे (सर्व रा. अर्जुनसोंड ता. मोहोळ) यांच्यावर गुन्हा दाखल केला.

बुधवार पेठेत विवाहित तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर : एका ३० वर्षीय विवाहित तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना न्यूबुधवार पेठ परिसरातील प्रभाकर मंदिराजवळ रविवारी दुपारच्या सुमारास घडली.

सद्दाम रशीद शेख (वय ३० रा.प्रभाकर महाराज मंदिराजवळ) असे मयताचे नाव आहे. त्याने रविवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास बेडरूम मधील छताच्या लाकडी वाशाला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत सद्दाम शेख याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा,भाऊ असा परिवार आहे. त्याचे मधला मारुती परिसरात फुल विक्रीचे दुकान आहे. त्याची पत्नी मुलाला घेऊन दोन दिवसापूर्वी माहेरी गेली होती. रविवारी दुपारी दुकानातून आल्यानंतर त्याने हा प्रकार केला. अशी माहिती नातेवाईकांनी दिली. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे. या मागचे कारण समजले नाही.

सोलापूर बाजार समिती निवडणूक

मतदार यादी जुनी की नवी; आज फैसला

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक जुन्या की नवीन मतदार यादीनुसार होणार याची सुनावणी उच्च न्यायालयात सोमवारी होणार आहे.

बाजार समिती संचालक मंडळ निवडणुकींची ३ फेब्रुवारी रोजी सुनावणी टेबलावर आली नसल्याने फैसला पुन्हा लांबणीवर पडला होता. विधानसभा आणि पावसाळा असल्याने सोलापूर आणि बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक डिसेंबरपर्यंत लांबणीवर टाकण्यात आली होती.

जानेवारीत निवडणुका सुरू होणे अपेक्षित असताना शासनाने राज्यातील १२ बाजार समित्यांच्या निवडणुकींसाठी नव्याने मतदार यादी तयार करण्याचे आदेश दिले.

सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकींसाठी न्यायालयात याचिका आहे. याचिकाकर्त्यांनी निवडणूक येण्याची मागणी केली आहे. त्यामुळे जुन्या मतदार यादीवर निवडणूक होणार की नव्याने मतदार यादी करणार, संचालक मंडळाच्या निवडणुकींसाठी मतदार यादी १८० दिवसांच्या आतीलच का असावी? या संदर्भात राज्य शासन व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण त्यांचे म्हणणे मांडणार आहे. मतदार यादीवर शासन आणि प्राधिकरणाचे म्हणणे काय आहे?, उच्च न्यायालय याचिकेवरील सुनावणी वर कोणता फैसला सोमवारी निश्चित होण्याची शक्यता आहे.

निसरा डोळा

– प्रकाश पोरे

ऑईल फ्री जेवण बनवूनही तुमची जीभ कशी घसरते हो?

प्रवास क्षणभराचा मात्र विखार वर्षानुवर्षांचा

आता बार्शी तालुक्याचे लक्ष राऊत यांच्या पुनर्वसनाकडे

बार्शी/सचिव अपसिंगकर

बार्शी बसस्थानकावर नव्याने रुजू झालेल्या दहा बसेसच्या लोकार्पण सोहळ्यात बार्शीचे विद्यमान आमदार दिलीप सोपल आणि माजी आमदार राजाभाऊ राऊत यांनी क्षणभर एकत्रित प्रवास केला. त्यांचा प्रवास क्षणभराचा असला तरी त्यांच्या मनात साठलेला विखार मात्र वर्षानुवर्षांचा आहे. बार्शी तालुकासुद्धा या दोघांच्या राजकीय युद्धामध्ये अनेक वर्षे होरपळलेला आहे. त्यामुळे बार्शीचे समाज जीवन सुद्धा दोन राजकीय गटांमध्ये विभागलेले आहे.

राऊतांचे पुनर्वसन निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाचे

भाजपामध्ये विधान परिषदेची उमेदवारी देताना अनेक चाचण्या आणि निकष असतात या पार्श्वभूमीवर राऊत यांचा विधान परिषदेच्या उमेदवारीसाठी कशा पद्धतीने विचार होतो यावर बार्शी तालुक्याच्या राजकारणाला वळण मिळणार आहे. २०२५ हे वर्ष बार्शी तालुक्यासाठी विविध निवडणुकांचे आहे राऊत यांचे राजकीय पुनर्वसन या निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. राऊत यांचे तालुक्यात कार्यकर्त्यांचे मोठे जाळे आहे .मात्र त्यांचे राजकीय पुनर्वसन झाल्यास त्यांचा गट पुढच्या स्पर्धेसाठी शक्तिशाली होणार आहे.

गेल्या ३० वर्षांमध्ये राजभाऊ राऊत हे सोपल यांचे प्रबळ विरोधक म्हणून तयार झाले. या दोघांमध्ये गेली तीस वर्ष विधानसभेचा सामना रंगत आहे. या दोघांमध्ये झालेल्या सहा लढतींमध्ये दोन वेळा राऊत यांनी तर चार वेळा सोपल यांनी बाजी मारली आहे. गेल्या ३० वर्षात सतत नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद, बाजार समिती, सोसायटी अशा विविध सत्ता केंद्रांच्या निवडणुकांच्या निमित्ताने या दोघांचे गट आमने सामने आले आहेत. राजकारणामध्ये विरोध हा काही वेळा टोकाला जातो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे बार्शी तालुका आहे. इतर अनेक तालुक्यात राजकीय प्रतिस्पर्धी निवडणुका झाल्यानंतर एकमेकांबरोबर अगदी हसत खेळत असतात पण बार्शी तालुक्यात मात्र या दोघांच्या संबंधांची उडी मात्र एकमेकांचे व्यासपीठावर नाम उल्लेख करण्यापलीकडे गेलेले नाही. माजी आमदार राजा राऊत यांचा गट राऊत यांच्यावर राजकीय कारणांमुळे झालेले चार हल्ले विसरणे शक्य नाही. सोपल बार्शी तालुक्यात शक्तीशाली असताना त्यांच्या विरोधात दंड थोपटून उभे राहण्याचे धाडस फक्त राजाभाऊ राऊत यांनी केले. सोपल यांचे इतर विरोधक सोपल यांच्यासमोर फार काळ टिकू शकले नाहीत. राऊत यांनी मात्र सर्व आघाड्यांवर संघर्ष केला आणि ते सोपल यांच्या राजकारणाला कायम आव्हान देत राहिले. आता विधानसभेची निवडणूक झाली आहे. राज्यात महायुतीचे सरकार अवतरले आहे .दिलीप सोपल हे आमदार झाले असले तरी ते सत्ताधारी पक्षात नाहीत. त्यामुळे त्यांच्या समर्थकांच्या आनंदावर विरजण पडले आहे. राज्यात भाजपा सत्तेवर असताना आणि देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना राऊत यांना विधानसभेच्या निवडणुकीत पराभव पत्करावा लागला आहे. मात्र भाजपाचे सरकार असल्यामुळे राऊत गटामध्ये काही प्रमाणात समाधान सुद्धा आहे. सर्व प्रकारची तयारी करून सुद्धा राऊत यांचा विधानसभेला पराभव झाला त्यामुळे ते अस्वस्थ असणे सहाजिक आहे. पण राऊत यांनी भाजपासाठी दिलेले योगदान लक्षात घेऊन त्यांच्या राजकीय पुनर्वसनाची मागणी होत आहे. राऊत सुद्धा सहजासहजी शांत बसणारे नेते नाहीत. त्यामुळे त्यांचे राजकीय पुनर्वसन होणार का याची चर्चा आहे. विधान परिषदेच्या उमेदवारांची यादी खूप मोठी आहे, त्यासाठी मोठे लॉबिंग करावे लागते.